## जनसंपर्क विभाग

जळगाव. दि. १० (          ): कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या भाषा अभ्यास प्रशाळा व संशोधन केंद्रात मराठी भाषा संवर्धन पंधरवडानिमित्त दि.८ जानेवारी रोजी कविसंमेलनाचे आयोजन करण्यात आले होते.

या कविसंमेलनाचे अध्यक्षस्थानी प्रशाळेचे संचालक प्रा.म.सु.पगारे होते. याप्रसंगी महाराष्ट्रातील दिग्गज व नामवंत कवी उपस्थित होते. या मान्यवर कवींनी त्यांच्या कविता सादर केल्या. त्यात कवी किसन पाटील, प्रभाकर महाजन, अशोक कोतवाल, प्रकाश किनगावकर व संजीवकुमार सोनवणे आदींनी त्यांच्या सुश्राव्य काव्याने श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले.

` पोरं जाऊ लागतील विहारात
सम्यक ज्ञानाच्या शोधात ..`

हया संजीवकुमार सोनवणे यांच्या `पोरं` या कवितेतील उपरोक्त ओळींनी परिवर्तनवादी विचाराचा सम्यक रस्ता नव्यापिढीला दाखविला. शिक्षणामुळे सामान्य माणसाच्या जीवनामध्ये बदल होतो. महापुरुषांचे विचार सामान्य माणसाच जीवन व्यवहार उंचावण्यासाठी मदत करतो. कवी प्रभाकर महाजन यांनी त्यांची ` भूई भकास ` आणि `राणातली माय` या व इतर कविता सादर केल्या. ते रानातील राबणाऱ्या कष्टकरी मातेचे वर्णन करतांना म्हणतात,

` कसायाची गाय तशी रानातली माय`

अशोक कोतवाल त्यांच्या ` कुकूबुक्का` व इतर कवितातून सामाजिक व धार्मिक सलोख्याचे चित्रण दिसले. ते म्हणाले,

` अग अम्मी गाऊ लागली अभंग
मनात माझ्या लागले उठू अद्‌वैताचे तरंग...`

हिंदू-मुस्लिम एकोपा व त्यांच्या भाव जाणीवा या कवितेतून प्रभावीपणे श्रोत्यांना जाणवल्या आणि विविध समाजाच्या एकोप्याचे दर्शनही घडले. कवी किसन पाटील यांनी त्यांच्या `कबीर ` आणि `मुखवटे ` या कवितांमधून वास्तव परिस्थितीचे विदारक चित्रण केले.

` या जगाच्या कोलाहलाथ प्रत्येकाचा कधी ना कधी होत असतो कबीर `

काव्य मैफिलीत प्रशाळेचे संचालक प्रा.डॉ.म.सु.पगारे यांनी त्यांची ` महात्मा ` आणि `शांत अशांत` या कविता सादर केल्या. डॉ.आशुतोष पाटील त्यांच्या `माणूस समजून घेतांना` या कवितेतून वास्तव जगाचे भयान चित्रण व्यक्त केले. सुत्रसंचालन व आभार डॉ.आशुतोष पाटील यांनी केले.

---

जा.क्र.कबचौउमवि/१६/हस्तदेय/२०१९ दिनांक:- १० जानेवारी, २०१९

प्रति,

**मा. संपादक / प्रतिनिधी,**

कृपया, उपरोक्त बातमी आपल्या दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू,
स्वाक्षरीत प्रत/-
( डॉ.सुनील पाटील )
जनसंपर्क अधिकारी